CNR No. MHNG090010702015

नि.दि.ख.क्र.– ११४/२०१५
गुलाब–वि–मोहम्मद अली.
निशाणी क्र.६५ च्या पुढे.

**नांव – गौरव गुलाबराव बावने.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ यांचा अधिकचा सरतपास श्री.ठावरे वकीलांमार्फत.**

०९) माझे पुराव्याचे शपथपत्र **निशाणी क्र.६५** मधील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला असून तो खरा व बरोबर आहे. तो वाचून–समजून मी त्यावर सही केली आहे.

१०) आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/१** वरील दस्त, वाद मिळकतच्या **इंडेक्स ०२ ची सत्यप्रत** दाखवण्यात आली. तो दिनांक ०७/०९/१९८६ रोजीचा दस्त आहे. सदर दस्त पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र.६६** देण्यात येतो. परमानंद हे माझे मोठे काका आहे. फकीराजी माझे आजोबा (वडिलांचे वडील) आहे. आता मला आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/३** वरील दस्त फकीराजी यांनी वाद मिळकत शेख सिकंदर शेख ऊमराव यांचेकडून दिनांक ०७/०८/१९४४ रोजी नोंदणीकृत खरेदीखेताने खरेदी घेतल्याचा **मुळ दस्त** दाखवण्यात आला. तो दस्त माझे वडिलांकडे होता, त्यानंतर तो मला प्राप्त झाला. सदर दस्त ३० वर्ष जुना असून तो योग्य ताब्यामधून दाखल झाला असल्याने व पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र.६७** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/४** वरील दस्त वाद मिळकतची अनुक्रमांक ६१५ वरील **आखीव पत्रीकेची सत्यप्रत** दाखवण्यात आली. तो दिनांक ११/०६/२०१५ रोजी प्राप्त झाला. सदर दस्त पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र.६८** देण्यात येतो. विजय पुरुषोत्तम बावनकर हे माझे चुलतभाऊ आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/९** वरील दस्त वादी विजय व माझे वडील यांनी पोलीस ठाणे, केळवद येथे दिनांक २३/०५/२०१५ रोजी दिलेल्या **तक्रारीची स्थळप्रत** दाखवण्यात आली. त्यावर माझे मयत वडील गुलाबराव यांची सही आहे, ती मी ओळखतो व त्यावर संबंधीत पोलीस

अधिका–याची पोच म्हणून सही आहे. सदरचा दस्त ओळखण्याकरिता **निशाणी आर्टिकल 'अ'** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/५** वरील दस्त परमानंद, विजय, विकास, कमलाकर व इतर यांचेमध्ये व माझे वडील गुलाबराव यांचेमध्ये वाद मिळकतच्या संदर्भात झालेल्या करारनाम्याची छायांकित प्रत दाखवण्यात आली. सदरच्या दस्ताला ओळखण्याकरिता **निशाणी आर्टिकल 'ब'** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/७** वरील दस्त गुंजन फोटो स्टुडीओ यांनी विजय बावनकर यांच्या नावाने दिलेले **बिल** आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/६–ए व ६–बी** वरील दस्त ०२ फोटो आहेत. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/८** वरील दस्त नांदागोमुख ग्रामपंचायतीद्वारे प्रतिवादी क्र.०२ यांना दिलेल्या **नोटीस** त्याचे मुलाला प्राप्त झाल्याबाबतची छायांकित प्रत आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/१०** वरील दस्त नांदागोमुख ग्रामपंचायतीकडे विजय व गुलाबराव यांनी प्रतिवादी क्र.०२ विरुध्द **तक्रारीची स्थळप्रत** असून त्यावर संबंधीत अधिका–यांची सही व शिक्का आहे. त्यावर माझे मयत वडिलांची सही आहे, ती मी ओळखतो. सदरच्या दस्ताला ओळखण्याकरिता **निशाणी आर्टिकल 'क'** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/११** वरील दस्त विजय व गुलाबराव यांनी प्रतिवादी क्र.०२ विरुध्द पोलीस ठाणे, केळवद येथे दिलेल्या **तक्रारीची कार्बन प्रत** आहे व त्यावर संबंधीत अधिका–यांची सही आहे. त्यावर माझे मयत वडिल व विजय यांची सही आहे, ती मी ओळखतो. सदरच्या दस्ताला ओळखण्याकरिता **निशाणी आर्टिकल 'ड'** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/१२** वरील दस्त विजय व गुलाबराव यांनी प्रतिवादी क्र.०२ विरुध्द पोलीस ठाणे, केळवद येथे दिलेल्या **तक्रारीची एन.सी. ची छायांकित प्रत** आहे. त्यावर संबंधीत अधिका–यांची व तक्रारदाराची सही आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/१३** वरील दस्त पोलीस ठाणे, केळवद यांचेमार्फत विजय व गुलाबराव यांना

दिलेल्या **नोटीसची मुळप्रत** आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/१४** वरील दस्त विजय व गुलाबराव यांनी राजेंद्र, मोहम्मद अली व ग्रामपंचायत, नांदागोमुख यांना माझे वकील श्री. ठावरे यांचेमार्फत पाठविलेल्या **नोटीसची स्थळप्रत** आहे. त्यावर माझे वकीलांची सही आहे, ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.६९** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/१५** वरील दस्त विजय व गुलाबराव यांनी राजेंद्र, मोहम्मद अली यांनी माझे वकील श्री. ठावरे यांचेमार्फत पाठविलेल्या **नोटीसचे उत्तराची मुळप्रत** आहे, ती माझे वकीलांना प्राप्त झाली. त्यास **निशाणी क्र.७०** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/१६** वरील दस्त विजय व गुलाबराव यांनी ग्रामपंचायत, नांदागोमुख यांनी माझे वकील श्री. ठावरे यांचेमार्फत पाठविलेल्या **नोटीसचे उत्तराची मुळप्रत** आहे, ती माझे वकीलांना प्राप्त झाली. त्यास **निशाणी क्र.७१** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४/१७** वरील दस्त ग्रामपंचायत, नांदागोमुख यांनी विजय व गुलाबराव यांना पाठविलेल्या **नोटीसची मुळप्रत** आहे, ती विजय व गुलाबराव यांना प्राप्त झाली. त्यावर संरपंच्यांची सही व शिक्का आहे. सदरच्या दस्ताला ओळखण्याकरिता **निशाणी आर्टिकल 'इ'** देण्यात येतो. माझे मयत वडील गुलाबराव यांनी दिनांक २७/०७/२०१५ रोजी प्रतिज्ञालेख दिनांक ०४/०८/२०१५ रोजी दाखल केला, तो **निशाणी क्र.१९** वर आहे. त्यातील मजकूर मला मान्य आहे.

**११)** आता मला दस्त यादी **निशाणी क्र.२०/१** वरील दस्त गुंजन फोटो स्टुडीओ यांचे दिनांक १५/०७/२०१५ रोजीचे ०२ फोटो काढल्याबाबत विजय बावनकर यांच्या नावाने दिलेले **बिल** आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.२०/२ व ३** वरील दस्त गुंजन फोटो स्टुडीओ यांनी दिलेले **०२ फोटो** आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.२०/४** वरील

दस्त इब्राहीम यांनी चंद्रभान यांना जागा विकल्याबाबत नोंदणीकृत **खरेदीखताची दिनांक ०३/०१/१९५१ रोजीची छायांकित प्रत** आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.२०/५** वरील दस्त मेघराज मोवाडे, चक्रधारी मोवाडे यांनी शेख नथ्थु उर्फ अब्दुल करीम यांना जागा विकल्याबाबत नोंदणीकृत **खरेदीखताची दिनांक ०२/०३/१९६७ रोजीची छायांकित प्रत** आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.२०/६** वरील दस्त नांदागोमुख या गावाचा **शिट नं. ०६ च्या नकाशाची छायांकित प्रत** आहे.

१२) आता मला दस्त यादी **निशाणी क्र.२६/१** वरील दस्त वाद मिळकतीचे **नकाशाची दिनांक ११/०६/२०१५ रोजीची प्रमाणित प्रत** आहे. सदरचा दस्त पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **<u>निशाणी क्र.७२</u>** देण्यात येतो.

१३) आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/१** वरील दस्त परमांनद बावनकर यांनी प्रतिवादी क्र.०२ यांना जागा विकल्याबाबत नोंदणीकृत **खरेदीखताची दिनांक ०७/०८/१९८६ रोजीची सत्यप्रत** आहे. तो दस्त माझे वडिलांकडे होता, त्यानंतर तो मला प्राप्त झाला. सदर दस्त ३० वर्ष जुना असून तो योग्य ताब्यामधून दाखल झाला असल्याने व पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **<u>निशाणी क्र.७३</u>** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/२** वरील दस्त इब्राहीम गुलजार पिंजानी यांनी चंद्रभान मुकुंदा तेली यांना करुन दिलेले नोंदणी कृत **विक्रपत्राची प्रमाणित प्रत** आहे. तो दस्त वाद मिळकतीची चतुर्सिमा दाखवण्याकरिता आवश्यक आहे. सदरचा दस्त पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **<u>निशाणी क्र.७४</u>** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/४** वरील दस्त फकीरा, परमानंद, विजय वगैरे व गुलाबराव यांच्यामध्ये दिनांक २० जुन, १९८३ रोजी झालेल्या

**वाटणीपत्राची मुळप्रत** आहे. त्यावर माझे मयत वडिलांची सही आहे, ती मी ओळखतो, त्यातील मजकूर मला मान्य आहे. तो दस्त माझे वडिलांकडे होता, त्यानंतर तो मला प्राप्त झाला. सदर दस्त ३० वर्ष जुना असून तो योग्य ताब्यामधून दाखल झाला असल्याने व पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र.७५** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/५** वरील दस्त ग्रामपंचायत, नांदागोमुख यांनी दिलेल्या पत्राची **जावक क्र.८११ दिनांक २२/०८/२०१५ मुळप्रत** आहे. त्यावर संबंधीत ग्रामविकास अधिकारी यांची सही व शिक्का आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/६** वरील दस्त ग्रामपंचायत, नांदागोमुख यांचे सभा दिनांक २७/०६/२०१५ मध्ये पारीत झालेला **ठराव पुस्तक क्र.७/५ ची सत्यप्रत** आहे. त्यावर संबंधीत ग्रामविकास अधिका–यांची सही असून जावक क्र.८१२, दिनांक २२/०८/२०१५ रोजीची आहे. ती मी प्राप्त केली. सदरचा दस्त पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र.७६** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/७** वरील दस्त ग्रामपंचायत, नांदागोमुख यांचे आवक रजिस्टरची ची प्रत दिनांक २२/०८/२०१५ रोजीची असून ती दिनांक १८/०४/२०१५ ते दिनांक २४/०४/२०१५ पर्यंतची **प्रमाणित प्रत** आहे, ती मी प्राप्त केली. सदरचा दस्त पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र.७७** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/८ व ९** वरील दस्त ग्रामपंचायत, नांदागोमुख यांनी प्रतीवादी क्र.०२ व ०१ यांची कर आकारणी यादीची प्रमाणित प्रत आहे, ती मी प्राप्त केली. सदरचा दस्त पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास अनुक्रमे **निशाणी क्र.७८ व ७९** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/१०** वरील दस्त दिनांक ०५/१०/१९३९ रोजी फकीरा यांनी हैदर व भाऊ गुलजार, रसुल व इतर यांच्याकडून घर व गोठा विकत घेतल्याबाबतची **विक्रीपत्राची मुळप्रत** आहे. तो दस्त माझे वडिलांकडे होता,

त्यानंतर तो मला प्राप्त झाला. सदर दस्त ३० वर्ष जुना असून तो योग्य ताब्यामधून दाखल झाला असल्याने व पब्लीक डॉक्युमेंट असल्याने त्यास **निशाणी क्र.८०** देण्यात येतो. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/११** वरील दस्त माझे मयत वडिलांनी अतिरिक्त प्रतिज्ञालेख **निशाणी क्र.५२** प्रमाणे दाखल केला, तो मला मान्य आहे. आता मला दस्त यादी **निशाणी क्र.४६/१२** वरील दस्त मयत गुलाबराव व विजय यांनी ग्रामपंचायतीतील दिलेल्या **तक्रार अर्जाची स्थळप्रत** आहे. त्यावर संबंधीत **आवक–जावक क्र.१६६, दिनांक २२/०५/२०१५** रोजीचे आहे. सदर दस्तावर माझी देखील सही आहे, त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरच्या दस्तास **निशाणी क्र.८१** देण्यात येतो.

**सरतपास सहमतीने पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

**वा.दा.ब.अ.क.क.का.दा.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**
**समक्ष**

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू )**
**३ रे सह. दि. न्यायाधीश क–स्तर,**
**सावनेर, जि. नागपूर.**
दिनांक – ०१/११/२०२२.

स्वा./–
**(प्रियंका पी. नातू )**
**३ रे सह. दि. न्यायाधीश क–स्तर,**
**सावनेर, जि. नागपूर.**

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- Mahesh L. Ingale